॥ श्री सद्गुरु आरती ॥

फळलें भाग्य माझें धन्य झालों संसारी ।
सद्गुरु भेटला हो तेणें धरियेलें करीं ॥
पश्चिमे चालवीलें आत्मस्तुती निर्धारीं ।
त्रिकुटावरी नांद देखियेला पंढरी ॥ १ ॥

तें सुख काय सांगूं वाचे बोलता न ये ।
आरतिचेनि गुणें गेलें मीपण माये ॥ धृ ॥

राउळामाजीं जातां राहे देह अवस्था ।
मन हें उन्मन झालें नसे बद्धतेची वार्ता ॥
हेतु हा मावळला शब्दा आली नि:शब्दता ।
तटस्थ होऊनि ठेलों नीजरूप पहातां ॥ २ ॥

त्रिगुण गुण बाई पूर्ण जळत्या वाती ।
नवलाव अविनाश न समायें समंज्योती ॥
पाहतां लक्ष तेथें हालूं विसरली पातीं ।
नातुडे माझें नाही दिवसराती ॥ ३ ॥

आरती सद्गुरुचि उजळली अंतरीं ।
प्रकाश थोर झाला सांठवेना अंबरी ॥
रविशशि मावळले तया तेजामाझारीं ।
वाजती दिव्य वाद्यें अनुहाते गजरी ॥ ४ ॥

आनंदसागरांत प्रेमें दीधली बुडी ।
लाधलें सौख्य मोठें न ये बोलीं ॥
सद्गुरुचेनि संगें ऐसी आरती केली ।
निवृत्तीनें आनंदाची तेथे वृत्ति निमाली ॥ ५ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 26, 1999